# <u>सामंजस्य करार</u>

हा सामंजस्य करार (इथून पुढे "MoU" म्हणून ओळखला जाईल) **डिसेंबर २०२२** ला, नाशिक महाराष्ट्र येथे खालील नमूद पक्षकारांमध्ये झाला.

**पक्ष नं. १-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र राज्य (यापुढे "शबरी महामंडळ" म्हणून संबोधण्यात येईल) कंपनी कायदा १९५६ मधील तरतुदीनुसार स्थापन झालेली कंपनी यांचे तर्फे **श्रीमती. लीना बनसोड, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.**

**आणि**

**पक्ष नं. २-**

वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती ही संस्था सहकार कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्था असून संस्थेचे कार्यालय मु मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती येथे आहे (यापुढे "वेणूशिल्पी संस्था" म्हणून संबोधण्यात येईल). **डॉ. निरुपमा देशपांडे, अध्यक्ष व श्रीमती चंदा कनोजे, सचिव** (आज रोजी नाशिक येथे मुक्कामी) हे वेणूशिल्पी संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी असून त्यांना या करारनाम्यावर स्वाक्षरीचे अधिकार देण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

वरील नमूद दोन्ही पक्षकार यांना एकत्रित पक्षकार आणि एकटे पक्षकार असे संबोधण्यात येईल.
करणे सामंजस्य करारनामा लिहून ठेवतात ऐसा जे कि,

१. आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सन १९७२ मध्ये समाज कल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचनालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. २२ एप्रिल १९८२ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणासाठी सन १९९२ मध्ये आदिवासी विकास संचनालय हे आदिवासी विकास आयुक्तालयात विलीन करण्यात आले. आदिवासी समाजाच्या विकास व उन्नतीसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये करण्यात आली.
२. शबरी महामंडळाचा उद्देश अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वतःच्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरण यांच्यामार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतूक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यमातून योजना आखणे, प्रचलित करणे, मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य करणे, संरक्षण देणे आणि अश्या प्रकारचे विविध उपक्रम हाती घेणे हा आहे.

३. शबरी महामंडळ हे आदिवासी कुटुंबांचे कृषी व कृषी-सलग्न उपजीविका वृद्धीचे कार्य करण्यास इच्छुक आहे. या करिता आदिवासी बहुल भागातील कार्यरत आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी, आदिवासी सहकारी संस्था, वनधन केंद्र, आदिवासींचे ग्राम सभा, ग्राम सभांचे फेडरेशन, स्वयं सहायता समूहांचे फेडरेशन इत्यादी यांचे मार्फत कृषी-आधारित मूल्य साखळी निर्मितीचे प्रकल्प तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

४. केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत राज्य शासनास अनुदान प्राप्त होत असते. राज्यात सध्यास्थितीत बहुतांश आदिवासी शेतकरी त्यांचे शेत उत्पादन वैयक्तिकरित्या व्यापाऱ्यांना किंवा परिसरातील प्रक्रिया केंद्रास विक्री करतात. याकरिता सहकारी तत्वावर एकत्रितपणे प्रतवारी यंत्राद्वारे धान्याची साफसफाई, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग करून त्याची विक्री केल्यास आदिवासी शेतकऱ्यांना चांगली किंमत/भाव मिळून त्यांचा फायदा होऊ शकतो.

५. राज्य शासनाने सन २०१९-२० य आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनास प्रस्ताव सादर केलेले होते. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे मुल्यमापन समितीची (Project Appraisal Committee – PAC) बैठक दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत केंद्र शासनाने विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत "Organizing FPOs of 15000 Farmers for Processing, Distribution, Branding and Retailing" या योजनेअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या सक्षम करण्याकरिता रक्कम रु.२४४०.०० लक्ष इतका निधी सन २०१९-२० करिता मंजूर करण्यात आलेला आहे.

६. याकरिता शबरी महामंडळ यांचे नियोजनानुसार शेतकरी उत्पादक कंपन्यांना, कारीगरांना, उत्पादक सहकारी संस्थाना शेत-उत्पादन प्रक्रिया, वितरण व विक्री या बाबतीत सक्षम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार शेतकरी उत्पादन कंपन्यांना जाहिरातीद्वारे आवाहन केले होते. त्याच्या प्रतिसादानुसार अमरावती जिल्ह्यातील वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती यांचा "मेळघाटातील आदिवासी युवक युवतींना बांबू द्वारे रोजगार निर्मिती व उत्पन्न वृद्धीसाठी प्रकल्प" या आशयाचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

७. सदर प्राप्त प्रस्तावांचे शबरी महामंडळाद्वारे क्षेत्रीय मुल्यांकन करून प्रस्तावामध्ये आवश्यक फेरबदल करण्यात आले. शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदर प्रस्तावाचे दिनांक ०७ डिसेंबर २०२२ रोजी योजनेच्या मुल्यांकन समितीसमोर सादरीकरण करण्यात आले. या बैठकीत सदर प्रस्ताव मंजूर करून कार्यान्वित करण्याचे ठरविण्यात आले.

८. शबरी महामंडळामार्फत जा.क्र.श.अ.वि.वि.म./कें.सहा/प्रकल्प/ /२२ दिनांक २८.१२.२०२२ रोजी वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती यांचा "मेळघाटातील आदिवासी युवक युवतींना बांबू द्वारे रोजगार निर्मिती व उत्पन्न वृद्धीसाठी प्रकल्प" या प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

९. वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती यांची महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचे अधिनियम १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एटीआयय/ डीआरआय/पीआरडी/आय/४०२/९८-९८ दि. ५/५/९८ नुसार नोंदणी झाली.

१०. वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती या औद्योगिक उत्पादक संस्थेत १५० आदिवासी कारागीर सभासद असून सदर संस्था ६०० पेक्ष्या जास्त कारागिरांना आपल्या सुविधा पुरवित आहे.

११. या उत्पादक संस्थेद्वारे सभासद सदस्यांचा बांबू व कच्चामाल जसे माळ, लँम्प, पात्राधार, राखी, कानातले, टोपल्या, सुप इत्यादी खरेदी करून त्यावर प्रकिया करून त्याची विक्री करणे, नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

१२. शेतीसोबत परिसरात उपलब्ध बांबूच्या वस्तू तयार करणे हा या परिसरातील आदिवासी कारागिरांचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे वेणूशिल्पी संस्थेच्या मार्फत सभासद कारागिरांचा माल विकत घेऊन त्यावर प्रक्रिया करून त्याची विक्री करणे असा मानस वेणूशिल्पी संस्थेचा आहे.

१३. वेणूशिल्पी संस्थेच्या माध्यमातून आदिवासी कारागिरांकडून त्यांची तयार केलेल्या बांबूच्या विविध वस्तू मालाची विक्री करण्याचे नियोजन आहे.

१४. वेणूशिल्पी संस्थेकडे आदिवासी कारागिरांचा बांबू वस्तू विकत घेण्यासाठी व मालाची वाहतूक खर्च करण्यासाठी लागणारा खर्च संस्थेकडे कमी भागभांडवल असल्यामुळे करणे शक्य होत नसल्याने वेणूशिल्पी संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी व विक्री होऊ शकली नाही. याकरिता आढावा घेतला असता वेणूशिल्पी संस्थेला कच्चा माल खरेदी करणे व प्रक्रिया केलेल्या मालाची विक्री करण्याकरिता खेळते भांडवल आवश्यक असल्याचे दिसून आले. याबाबींची उपलब्धता असल्याशिवाय वेणूशिल्पी संस्था सक्षम होऊ शकणार नाही.

१५. वेणूशिल्पी संस्थेंतर्गत असलेले आदिवासी कारागीर त्यांच्यावर असलेले कर्ज परतफेड करण्यासाठी व त्यांच्या गरजा भागविणेसाठी मोठ्या प्रमाणात त्यांचा उत्पादित माल हा ग्रामीण स्तरावरच विक्री करतात.

१६. शबरी महामंडळ यांचे समवेत वेणूशिल्पी संस्था काम करून कारागिरांना आवश्यक औजारे, प्रशिक्षण, नविन डिझाईनबद्दल चे मार्गदर्शन, त्यांचे उत्पादित मालाकरीता वाहतूक व्यवस्था व खेळते भांडवल उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे परिसरातील आदिवासी कारागिरांना बांबू मालावर प्रक्रिया, पेकेजींग, ब्रान्डींग, मार्केटिंग इ. करिता मदत मिळू शकेल. तसेच त्यांच्या मार्फत प्रक्रिया बांबूच्या उत्पादनाची विक्री चांगल्या योग्य भावाने होईल. त्याच प्रमाणे वेणूशिल्पी संस्था बांबू उत्पादकतेत वाढ, प्रशिक्षण, क्षमता वाढ, प्रक्रिया मालाची जाहिरात इत्यादी बाबींकरिता कार्य करेल व त्यासाठी आवश्यक कर्मचारी व संसाधने उपलब्ध करेल. ज्यायोगे आदिवासी कारागीरांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येईल.

१७. वेणूशिल्पी संस्था प्रकल्पांतर्गत उत्पादित होणाऱ्या वस्तूंची साठवणुकीसाठी आवश्यक व्यवस्था करेल.

१८. या करिता "मेळघाटातील आदिवासी युवक युवतींना बांबू द्वारे रोजगार निर्मिती व उत्पन्न वृद्धीसाठी प्रकल्प" हा उपजीविका प्रकल्प कार्यान्वित करून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या करीता दोन्ही पक्षकारांनी सामंजस्य करार करून नियम, अटी व शर्ती लिहून घेण्याचे ठरवले आहे.

**<u>आणि म्हणूनच दोंन्ही पक्षकारांमध्ये ठरल्याप्रमाणे नियम, अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील.</u>**

**१) योजनेचे नावं**

"Organizing FPOs of 15000 Farmers for Processing, Distribution, Branding and Retailing"

**२) उपजीविका प्रकल्पाचे नावं**

"मेळघाटातील आदिवासी युवक युवतींना बांबू द्वारे रोजगार निर्मिती व उत्पन्न वृद्धीसाठी प्रकल्प"

**३) योजनेचे लाभक्षेत्र**

अमरावती जिल्हयातील मेळघाटांतील धारणी व चिखलदरा तालुका हा आदिवासी परिसर.

**४) योजनेसाठी मार्गदर्शक तत्वे**

सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधी बाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेले आहेत.

१. योजनेसाठी द्यावयाचा निधी हा तीन भागात व टप्प्यात विभागाला जाईल.
२. पहिला भाग म्हणजे प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी **पायाभूत सुविधा उभी करणे, यंत्र सामग्री, मशिनरी खरेदी, साहित्य खरेदी, आवश्यक बांधकाम, गोदाम उभारणी व इतर अनुषंगिक** बाबींसाठी लागणारा निधी. हा निधी **सहाय्यक अनुदान (Grant in Aid)** म्हणून दिला जाईल.
३. दुसऱ्या भागात प्रकल्पासाठी लागणारे **क्षमता बांधणी, विपणन व तांत्रिक सहाय्य या सारखे इतर अनुषंगिक खर्च (Capacity Building and Hand holding for Marketing)** साठी लागणारा निधी देण्यात येईल. सदर खर्च हा **सहाय्यक अनुदान (Grant in Aid)** म्हणून दिला जाईल, परंतु हे अनुदान सहाय्य फक्त एक वर्षापुरते मर्यादित असेल. या करिता वेणूशिल्पी संस्थेंने त्यांचे खर्चा संदर्भातील नियोजन, programmatic खर्च इत्यादी बाबत सविस्तर तपशील सादर करावयाचा आहे.
४. निधीचा तिसरा भाग म्हणजे **खेळते भांडवल (Working Capital)**, प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल खरेदी करणे, मनुष्यबळ, पाणी, विद्युत, दररोजचा खर्च भागवण्यासाठी लागणारे भांडवल यासारख्या इतर बाबींसाठी लागणारा खर्च खेळते भांडवल (Working Capital) मध्ये करणे अपेक्षित आहे. खेळते भांडवल (Working Capital) हे कर्ज स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येईल. खेळते भांडवल (Working Capital) हे ३ वर्षांकरिता शून्य टक्के (०%) व्याज दराने उपलब्ध करून दिले जाईल. तर पुढील ५ वर्षा करिता द. सा. द. शे. तीन टक्के (३%) व्याज आकारण्यात येईल.

### ५) वित्तीय तरतूद रु. लाखात

| अ. क्र. | योजना उपशीर्ष | आर्थिक अनुदान सहाय्य | खेळते भांडवल | लाभार्थी हिस्सा | रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कारागीर कौशल्य वृद्धी (औजार) | | | | |
| | इलेक्ट्रिक ड्रील मशीन (५० * ३०००) | १.५० | | | १.५० |
| | इलेक्ट्रिक संडर मशीन (५० * ३०००) | १.५० | | | १.५० |
| २ | लवादा उद्योग शाळा - स्मोक चेंबर लहान | ०.२ | | | ०.२० |
| | ग्राम ज्ञानपीठ - स्मोक चेंबर मोठे (१०*२५=२५० Sq. Ft.) | २.५ | | | २.५० |
| | ग्राम ज्ञानपीठ - स्मोक चेंबर लहान | ०.२ | | | ०.२० |
| ३ | पेकिंग मटेरीअल निर्मिती | २ | | | २.०० |
| ४ | प्रचार प्रसार मटेरीअल | २ | | | २.०० |
| ५ | शास्त्री मिस्त्री कार्यशाळा (६० व्यक्ती कारागीर एक्स्पर्ट/ डिझाईनर/ आर्किटेक्ट) | १.०२ | | | १.०२ |
| ६ | डिजिटल लिटरसी प्रशिक्षण (आदिवासी युवक व महिलांसाठी ५०० व्यक्ती) | २.५ | | | २.५० |
| ७ | प्रवास खर्च | ०.५ | | | ०.५० |
| ८ | अन्य किरकोळ | ०.५ | | | ०.५० |
| ९ | तांत्रिक सहाय्य (Technical Support) | | | | ०.०० |
| | डिझाईनर सपोर्ट / मार्केटिंग सपोर्ट व प्रवास खर्च | | | ४.९ | ४.९० |
| १० | खेळते भांडवल (Working Capital) | | २५.०० | | २५.०० |
| | **एकूण** | **१४.४** | **२५.००** | **४.९** | **४४.३** |
| ११ | शबरी व्यवस्थापन खर्च (२%) | | | | ०.९ |
| | **एकुणांत** | | | | **४५.२** |

सदर योजनेकरिता रक्कम रु. १४.४० लक्ष इतका निधी आर्थिक अनुदान, खेळते भांडवल रक्कम रु. २५.०० लक्ष, लाभार्थी हिस्सा रक्कम रु. ४.९० लक्ष व शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च रक्कम रु. ०.९० लक्ष असे एकंदर रु. ४५.२० लक्ष इतकी वित्तीय तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.

### ६) योजना राबविणारी यंत्रणा

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या वतीने शाखा व्यवस्थापक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. धारणी व वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती.

### ७) नियंत्रण अधिकारी

व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक व त्यांनी नियुक्त केलेले सक्षम प्राधिकारी.

## ८) योजनेचा उद्देश व हेतु

आदिवासींच्या बांबू उत्पादक संस्थेच्या माध्यमातून बांबू उत्पादन क्षमतेत वाढ, बांबूवर प्रक्रिया उद्योग व बांबूच्या विविध वस्तूंची विक्री करून कारागिरांचा विकासात्मक दर्जा सुधारणे.

## ९) सामंजस्य कराची मुदत

सदर सामंजस्य करार हा दिनांक .१२.२०२२ रोजी अस्तित्वात येऊन कार्यारंभ आदेश दिल्यापासून पुढील ३ वर्ष किंवा खेळते भांडवलाची परतफेड करण्यास लागणारा कालावधी किंवा त्याबाबत मुदतवाढ दिलेला कालावधी यापैकी जे नंतर घडेल तो पर्यंत वैध राहील. तसेच सदरील कराराची मुदत वाढविण्याचे संपूर्ण अधिकार हे पक्ष क्रमांक १ यांचे कडे राहील.

## १०) वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती यांचे भूमिका, जबाबदारी आणि आणि दायित्वे

शासनाकडून प्राप्त होणा-या निधी करिता वेणूशिल्पी संस्था खालील बाबींकरिता विवेकपूर्ण जबाबदार असेल**.**

१. सदर योजना राबविण्याबाबतचे वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित केल्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे वेणूशिल्पी संस्था व शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, धारणी यांची राहील.

२. वेणूशिल्पी संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रात बांबूच्या विविध वस्तूची निर्मिती करतील.

३. सामंजस्य करारातील सविस्तर अटी व शर्तीनुसार विहित वेळेत स्मोक चेंबरची उभारणी पुर्ण करण्याची जबाबदारी वेणूशिल्पी संस्था यांची असेल.

४. वेणूशिल्पी संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रात आदिवासी कारागीरांना प्रकल्पांतर्गत मंजूर असलेले विविध कारागीर कौशल्य वृद्धी अवजार पुरवतील.

५. वेणूशिल्पी संस्था परिसरातील आदिवासी कारागीर उत्पादक यांचे बांबू व बांबूपासून तयार करण्यात आलेले वस्तू, उत्पादने योग्यभावाने खरेदी करतील.

६. वेणूशिल्पी संस्था आदिवासी कारीगरांच्या मालावर प्रक्रिया करणेसाठी आवश्यक सुविधा निर्माण करतील.

७. वेणूशिल्पी संस्था आदिवासींच्या कारीगरीच्या बांबू उत्पादकतेत वाढ, प्रशिक्षण, क्षमतावाढ, बांबूवर प्रक्रीया केलेले उत्पादने तयार करणे, प्रक्रिया मालाची जाहिरात करणे इत्यादी बाबींकरीता कार्य करेल व त्याकरिता आवश्यक कर्मचारी व संसाधने उपलब्ध करेल.

८. वेणूशिल्पी संस्था आदिवासी कारागीरांमार्फत बांबू पासून विविध वस्तू/उत्पादने तयार करणेसाठी कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेले प्रक्रिया केंद्राची मदत घेईल.

९. वेणूशिल्पी संस्था परिसरातील आदिवासी कारागीर सभासदांचे माळ, लॅम्प, पात्राधार, राखी, कानातले, टोपल्या, सुप यांसारखे इतर उत्पादने विकत घेऊन त्याची प्रक्रिया, प्रतवारी, पेकेजिंग वितरण व ब्रॅन्डिंग करून विक्री करतील.

१०. या प्रकल्पांतर्गत जे काही स्थापत्य बाबी निर्माण होतील त्या शबरी महामंडळ वेणूशिल्पी संस्था यांना ३० वर्ष दीर्घकालीन नाममात्र भाडेतत्वावर देईल. जर या स्थापत्य निर्मितीचा दिलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी गैर वापर झाला तर शबरी महामंडळ सदर स्थापत्य वस्तू ताब्यात घेऊन विहित

कार्यपद्धतीचा अवलंब करून इतर आदिवासी संस्था/FPO/FPC/Group यांना चालवण्यासाठी देतील अथवा स्वतः चालवतील. हे वेणूशिल्पी संस्था यांना मान्य असेल.

११. परिसरातील आदिवासी सभासद कारागिरांकडून खरेदी करून प्रक्रिया व प्रतवारी केलेल्या मालाचे उत्पादन व विक्री यांचा जमा खर्च ठेवण्याची जबाबदारी वेणूशिल्पी संस्थेची असेल.

१२. वेणूशिल्पी संस्था बांबू व बांबूपासून तयार केलेले वस्तू/उत्पादने यांची वितरण व विक्री करून प्राप्त झालेल्या किमतीतून उत्पादन खर्च वजा जाता शिल्लक नफ्याचे सम प्रमाणात उत्पादक आदिवासी कारागीर सभासदांना वाटप करेल. परंतु वेणूशिल्पी संस्था शिल्लक नफा प्रकल्पांतर्गत मंजूर झालेल्या खेळते भांडवलाचे परतफेड होई पर्यंत किंवा प्रकल्प मंजूर झाले नंतर कमीत कमी ३ वर्ष समप्रमाणात उत्पादक आदिवासी कारागीर सभासदांना नफ्याचे वाटप करू शकणार नाही.

१३. योजनेच्या शासन निर्णयात शासनामार्फत वेळोवेळी झालेल्या सुधारणा वेणूशिल्पी संस्था यांना बंधनकारक असतील.

१४. वेणूशिल्पी संस्था हे त्यांना आवश्यक असलेल्या तांत्रिक मार्गदर्शन व वस्तूंचे विक्री करणेसाठी लागणारे आवश्यक मदत घेणेसाठी संपूर्ण बांबू केंद्र, यवतमाळ, कृषी विभाग व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे सहाय्य घेतील.

१५. वेणूशिल्पी संस्था यांना प्रथम वर्षी अनुदानाचा पहिला हप्ता रक्कम रु. ७.२० लक्ष व खेळते भांडवल रक्कम रु. २५.०० लक्ष वितरीत करण्यात येईल. सदर रकमेचा विनियोग/वापर वेणूशिल्पी संस्था करारात नमूद केलेल्या बाबींसाठीच करू शकेल. कामाच्या प्रगतीनुसार द्वितीय हप्ता रक्कम रु. ७.२० लक्ष इतका वितरीत करण्यात येईल. हे वेणूशिल्पी संस्था ला मान्य असेल.

१६. योजनेच्या अंतर्गत देण्यात येणारे खेळते भांडवल (Working Capital) हे कर्ज स्वरूपाचे असेल. प्रथम ३ वर्ष या कर्जाचा व्याज दर हा शून्य टक्के (०%) इतका असेल. खेळते भांडवलाची (Working Capital) या कालावधीत परतफेड झाली नाही तर ४ थ्या वर्षापासून पुढील ५ वर्ष या कर्जाचा व्याज दर हा द. सा. द. शे. तीन टक्के (३%) इतका असेल. खेळते भांडवलाचे परतफेडीचे हप्ते व मुदतवाढ ठरविण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ, नाशिक यांना असतील. तथापि अशी मुदतवाढ जास्तीजास्त ४ थ्या वर्षापासून पुढील ५ वर्षापेक्षा असेल. परंतु त्यानंतर देखील सदरील खेळत्या भागभांडवलाची परत फेड न झाल्यास त्या थकीत रकमेवर द.सा.द.शे. ३% या दराने रक्कम वसूल होईपावेतो व्याज आकारण्यात येईल. तसेच पक्ष क्रमांक २ यांनी सदरील खेळत्या भांडवलाच्या रकमेची परतफेड विहित मुदतीत न केल्यास ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून त्यांचे कडून वसूल करण्याचे अधिकार पक्ष क्रमांक १ यांना राहतील. हि बाब वेणूशिल्पी संस्था यांना मान्य व कबुल असून त्याबाबत ते कोणताही वाद उपस्थित करणार नाहीत.

१७. शबरी महामंडळा सोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारातील सविस्तर अटी व शर्तीनुसार विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी वेणूशिल्पी संस्थेची असेल.

१८. योजनेच्या प्रगतीबाबतची माहिती वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांना व शासनास सादर करण्याची जबाबदारी वेणूशिल्पी संस्थेची असेल.

१९. योजनेच्या वेळोवेळी केलेल्या कामांचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शबरी महामंडळास सादर करणे वेणूशिल्पी संस्था यांना बंधनकारक असेल.

२०. सदर योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी व इतर माहिती वेणूशिल्पी संस्था यांना शबरी महामंडळास वेळोवेळी देणे बंधनकारक असेल.

२१. योजनेंतर्गत झालेल्या खर्चाची बिले, खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन, व इतर तत्सम खर्च), Vouchers व योजना अंमलबजावणी संबंधीचे आवश्यक कागदपत्रे व माहिती वेणूशिल्पी संस्था यांना शबरी महामंडळास वेळोवेळी देणे बंधनकारक असेल.

२२. सदर योजनेची अंमलबजावणी करतांना चलचित्र (Video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, धारणी व अंमलबजावणी यंत्रणा (वेणूशिल्पी संस्था) यांची राहील. तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged Photographs हे www.stcmic.gov.in/smis या वेबसाईटवर अपलोड करणे व योजनेच्या अंमलबजावणी अनुषंगाने योजनेच्या प्रगतीबाबत माहित वेळोवेळी CAS पोर्टलवर भरण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, धारणी व वेणूशिल्पी संस्था यांची राहील.

२३. योजनेच्या अनुषंगाने नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी वेणूशिल्पी संस्था यांची असेल.

२४. योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन, प्रवास, भोजन व इतर तत्सम खर्च) वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांना सादर करण्याची जबाबदारी वेणूशिल्पी संस्था यांची राहील.

२५. वेणूशिल्पी संस्था यांनी सदर योजना राबविण्याबाबतचे वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून मंजूर तरतुदीच्या मर्यादित प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक तयार करून शबरी महामंडळास मंजूर करणेसाठी सादर करणे बंधनकारक असेल.

२६. वेणूशिल्पी संस्था योजनेंतर्गत मंजूर खेळते भांडवल (Working Capital) साठी लागणारे Business Plan व Procurement Plan तयार करून शबरी महामंडळास सादर करतील.

२७. वेणूशिल्पी संस्था त्यांच्या सर्व सभासदांची यादी शबरी महामंडळास सादर करणे बंधनकारक राहील.

२८. योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी विविध शासकीय, अशासकीय व CSR कंपनी यांचे सोबत कृतीसंगम आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे. तसेच सदर योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी इतर माध्यमातून जर निधी मिळाला असेल किंवा मिळणार असेल तर त्याची माहिती वेणूशिल्पी संस्था शबरी महामंडळास देईल.

२९. योजनेचा लाभ देत असतांना विधवा, परितक्त्या, एकल महिला, दिव्यांग, अल्प व अत्यल्प भू-धारक यांना प्राधान्य देण्यात यावे.

३०. वेणूशिल्पी संस्था यांना योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांचे योजनापूर्वी व योजना नंतरचे आर्थिक उत्पन्न यांची माहिती घेऊन त्यांच्या उत्पनात झालेली वाढ याबाबतचा सविस्तर अहवाल व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांना सादरकरणे बंधनकारक असेल.

३१. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी व दैनंदिन कार्य योग्य पद्धतीने होण्यासाठी वेणूशिल्पी संस्था यांनी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे बंधनकारक असेल.

३२. वेणूशिल्पी संस्था यांनी योजनेविषयीची सविस्तर माहिती, सामंजस्य कराराची प्रत व इत्तर संबंधित कागदपत्र लाभार्थ्यांना वेळोवेळी दाखवण्यात यावेत.

३३. वेणूशिल्पी संस्था यांनी योजनेच्या प्रगतीचा अहवाल वेळोवेळी मूल्यमापन व सनियंत्रण समिती समोर सादर करावा. तसेच समिती मार्फत देलेल्या सूचनांची अंमलबजावणी विहित वेळेत करणे बंधनकारक असेल.

३४. वेणूशिल्पी संस्था यांनी मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या मर्यादितच योजना राबविण्याची दक्षता घ्यावी.

**११) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची भूमिका, जबाबदारी आणि दायित्वे**

१. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

२. योजनेच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ, नाशिक व वेणूशिल्पी संस्था यांच्यामध्ये सामंजस्य करार करणे.

३. मंजूर तरतुदीच्या मर्यादेत प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचार विनिमय करून अंतिम करणे.

४. सदर योजनेच्या मूल्यमापन व सनियंत्रणासाठी लागणारा निधी योजना खर्चाचे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांनी करावी.

५. सदर योजना राबविण्याबाबतचे वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित केल्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे वेणूशिल्पी संस्था व शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, धारणी यांची राहील.

६. सादर केलेल्या कामाच्या नियोजनानुसार व टप्प्यानुसार निधीची खात्रीशीर पूर्तता करून वितरीत करणे.

७. शबरी महामंडळ सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या इतर शासकीय विभागांचे सहाय्य मिळवून देण्यास वेणूशिल्पी संस्था यांना मदत करेल.

८. योजनेच्या प्रगतीबाबतची माहिती वेळोवेळी वेणूशिल्पी संस्था यांचे कडून घेऊन शासनास सादर करणे.

९. वेणूशिल्पी संस्था यांचेकडून त्यांनी केलेल्या कामांचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) घेणे.

१०. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी शबरी महामंडळाकडून नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

११. योजनेच्या प्रगतीपथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याकरिता मूल्यमापन व सनियंत्रण समिती गठीत करणे. समितीमध्ये आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ यांना समाविष्ट करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक शबरी महामंडळ, नाशिक यांना राहतील.

१२. योजनेच्या एकुण प्रस्तावित खर्च निधी पैकी २% निधी तसेच प्रकल्पातील शिल्लक निधी हा शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च म्हणून वापरता येईल.

१३. प्रकल्प क्षेत्रात वेळोवेळी भेटी देऊन वेणूशिल्पी संस्थेला योजना राबविणेसाठी लागणारे सहकार्य करणे.

१४. योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मूल्यमापन व सनियंत्रण समितीची दर सहा महिन्यातून बैठक आयोजित करणे.

## १२) प्रकल्प व्यवस्थापन, सनियंत्रण व अहवाल पद्धती

### १. मुल्यमापन व सनियंत्रण समिती

सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच वेणूशिल्पी संस्थेचे दीर्घकालीन धोरण व निर्णयास्तव खालील प्रमाणे मुल्यमापन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

- व्यवस्थापकीय संचालक, शबरी आ.वि.वि.महा. मर्या., नाशिक - अध्यक्ष
- प्रकल्प अधिकारी, ए.वि.आ.प्र. धारणी - सदस्य
- महाव्यवस्थापक (प्रशा.) शबरी आ.वि.वि.महा. मर्या., नाशिक - सदस्य
- महाव्यवस्थापक (वित्त/लेखा) शबरी आ.वि.वि.महा. मर्या., नाशिक -सदस्य
- वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती यांचे प्रतिनिधी -सदस्य
- विशेष आमंत्रित सदस्य -सदस्य
- शाखा व्यवस्थापक, श.आ.वि.वि.महा. मर्या., धारणी - सदस्य सचिव

२. सदर समिती योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मूल्यमापन व सनियंत्रण समिती म्हणून काम करेल. प्रगतीपथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याकरिता मूल्यमापन व सनियंत्रण समितीची सहा महिन्यातून एकदा किंवा समितीने ठरविल्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल. समितीमध्ये आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ यांना समाविष्ट करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शबरी आ. वि.व वि. मं. नाशिक यांना राहतील.

३. योजनेची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी वेणूशिल्पी संस्था यांचे मार्फत होईल तसेच शाखा व्यवस्थापक, श.आ.वि.वि.मं., धारणी हे वेणूशिल्पी संस्थेला योजना प्रभावीपणे राबविणेसाठी वेळोवेळी मदत करतील.

४. वेणूशिल्पी संस्था योजनेचा वार्षिक कृती आराखडा (आर्थिक वर्षासाहित) शबरी महामंडळास सादर करेल ज्यामध्ये वार्षिक भौतिक व आर्थिक तपशील (नियोजन) असेल. पहिल्या वर्षाचे वार्षिक कृती आराखडा सामंजस्य करार झाल्यानंतर १ महिन्यात सादर केला जाईल.

५. मुल्यमापन व सनियंत्रण समिती अपेक्षित परिणाम सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्प रचना, योजना आणि परिणाम व संबधितक्षेत्राच्या learnings वर आधारित बजेटमध्ये परस्पर मान्य केलेले बदल करू शकते. ते बदल वेणूशिल्पी संस्था यांचेवर लागू व बंधनकारक राहतील

६. वेणूशिल्पी संस्था शबरी महामंडळ यांना प्रत्येक सहामाहीच्या शेवटी प्रगती अहवाल सादर करेल आणि वार्षिक प्रगती अहवाल वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून एका महिन्याच्या आत सादर करेल. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीच्या दोन महिन्यांत शबरी महामंडळ यांना वार्षिक लेखापरीक्षण विवरण पत्रसादर करेल.

## १३) निधी वितरीत करण्याची कार्य पद्धती

सदर योजने करिता निधी वितरीत करण्याची कार्यपद्धती पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१. उभय पक्षात सामंजस्य करार झाल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक, श.आ.वि.मं. नाशिक हे वेणूशिल्पी संस्थेला रक्कम रु .१४.४० लक्ष इतका निधी अनुदान स्वरुपात व खेळते भांडवल रक्कम रु. २५.०० लक्ष असे एकदंर रक्कम रु. ३९.४० लक्ष रक्कम खालील हप्त्या प्रमाणे वितरीत करतील.

| अ.क्र. | निधीवितरणाचे हप्ते | निधीवितरणाचा कालावधी | रक्कमरु. |
|---|---|---|---|
| १ | पहिला हप्ता<br>(५०% आर्थिक अनुदान ) | प्रथम वर्ष (सामंजस्य करार झाल्यानंतर) | ७.२० लक्ष |
| २ | दुसरा हप्ता<br>(५०% आर्थिक अनुदान ) | कामाच्या प्रगतीनुसार | ७.२० लक्ष |
| ३ | खेळते भांडवल<br>(Working Capital) | प्रथम वर्ष (सामंजस्य करार झाल्यानंतर) | २५.०० लक्ष |
| | **एकूण** | | **३९.४० लक्ष** |

२. वेणूशिल्पी संस्थेला लाभार्थी हिस्सा एकत्रित रक्कम रु. ४.९० लक्ष प्रकल्पांतर्गत मंजूर बाबींसाठी खर्च करणे बंधनकारक असेल.

३. उपरोक्त नमुद निधी वितरणाची कार्यपध्दती दोन वर्षांकरीता राबविण्यात येईल.

४. संबंधित यंत्रणेने कार्यपुर्ण झाल्यानंतर आवश्यक असलेले कार्यपुर्णता व निधी विनियोग प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पुढील निधी वर्ग करण्यात येईल.

५. योजनेच्या अनुषंगाने नेमण्यात येणाऱ्या कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपुर्ण जबाबदारी वेणूशिल्पी संस्था यांची राहील, त्या कमी वेगळा निधी देय राहणार नाही.

६. योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन, प्रवास, भोजन व इतर खर्च, प्रशिक्षणाचा खर्च तसेच इतर तत्सम खर्च) वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आ.वि.वि.महा.मर्या., नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी वेणूशिल्पी संस्था यांची राहील.

७. योजनेच्या एकुण प्रस्तावित खर्च निधी पैकी २% निधी तसेच प्रकल्पातील शिल्लक निधी हा शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च म्हणून वापरता येईल.

**१४) खेळते भांडवल (Working Capital) परतफेड**

प्रकल्पांतर्गत देण्यात येणाऱ्या रकम रु. ५५.०० लक्ष खेळते भांडवल (Working Capital) ची परत फेड खालील प्रमाणे वेणूशिल्पी संस्था यांना करणे बंधनकारक असेल.

| **Repayment Schedule** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Project:** | मेळघाटातील आदिवासी युवक युवतींना बांबू द्वारे रोजगार निर्मिती व उत्पन्न वृद्धीसाठी प्रकल्प | | | | |
| **Name of Organization:** | वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती | | | | |
| **Total Project Cost:** | Rs. 45.20 Lakh | | | | |
| **Working Capital:** | Rs. 25.00 Lakh | | | | |
| **Rate of Interest:** | 0% for initial 3 years | | | | |
| **Project Duration:** | 3 Years (From January 2023 to January 2026) | | | | |
| **Sr. No.** | **Month** | **Principal Amount (Rs.)** | **Interest Amount (Rs.)** | **Total Payment (Rs.)** | **Balance Amount (Rs.)** |
| 1 | Feb-24 | 104167.00 | 0.00 | 104167.00 | 2395833.00 |
| 2 | Mar-24 | 104167.00 | 0.00 | 208334.00 | 2291666.00 |
| 3 | Apr-24 | 104167.00 | 0.00 | 312501.00 | 2187499.00 |
| 4 | May-24 | 104167.00 | 0.00 | 416668.00 | 2083332.00 |
| 5 | Jun-24 | 104167.00 | 0.00 | 520835.00 | 1979165.00 |
| 6 | Jul-24 | 104167.00 | 0.00 | 625002.00 | 1874998.00 |
| 7 | Aug-24 | 104167.00 | 0.00 | 729169.00 | 1770831.00 |
| 8 | Sep-24 | 104167.00 | 0.00 | 833336.00 | 1666664.00 |
| 9 | Oct-24 | 104167.00 | 0.00 | 937503.00 | 1562497.00 |
| 10 | Nov-24 | 104167.00 | 0.00 | 1041670.00 | 1458330.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | Dec-24 | 104167.00 | 0.00 | 1145837.00 | 1354163.00 |
| 12 | Jan-25 | 104167.00 | 0.00 | 1250004.00 | 1249996.00 |
| 13 | Feb-25 | 104167.00 | 0.00 | 1354171.00 | 1145829.00 |
| 14 | Mar-25 | 104167.00 | 0.00 | 1458338.00 | 1041662.00 |
| 15 | Apr-25 | 104167.00 | 0.00 | 1562505.00 | 937495.00 |
| 16 | May-25 | 104167.00 | 0.00 | 1666672.00 | 833328.00 |
| 17 | Jun-25 | 104167.00 | 0.00 | 1770839.00 | 729161.00 |
| 18 | Jul-25 | 104167.00 | 0.00 | 1875006.00 | 624994.00 |
| 19 | Aug-25 | 104167.00 | 0.00 | 1979173.00 | 520827.00 |
| 20 | Sep-25 | 104167.00 | 0.00 | 2083340.00 | 416660.00 |
| 21 | Oct-25 | 104167.00 | 0.00 | 2187507.00 | 312493.00 |
| 22 | Nov-25 | 104167.00 | 0.00 | 2291674.00 | 208326.00 |
| 23 | Dec-25 | 104167.00 | 0.00 | 2395841.00 | 104159.00 |
| 24 | Jan-26 | 104159.00 | 0.00 | 2500000.00 | 0.00 |
| | **Total** | **2500000.00** | | **2500000.00** | |

**१५) समाप्ती आणि परिणाम**

सदर सामंजस्य करार पुढील कारणास्तव संपुष्टात आणला जाऊ शकतो...

१. कोणत्याही वेळी दोन्ही पक्षांच्या परस्पर लेखी संमतीने.

२. कोणतेही कारण न सांगता त्या संदर्भात किमान ३० दिवस अगोदर लेखी नोटीस देऊन सामंजस्य करार संपुष्टात आणण्याचा अधिकार दोन्ही पक्षांना असेल. करार संपुष्टात आणण्याच्या नोटीस मध्ये हा सामंजस्य करार संपुष्टात आणण्याचे कारण निर्दिष्ट केले जाईल .मात्र अश्या परिस्थितीत सदरील करारनामा संपुष्टात आल्यास वेणूशिल्पी संस्था यांना देण्यात आलेल्या खेळते भांडवलाची तातडीने परतफेड करणे बंधनकारक राहील.

३. सामंजस्य करारात नमूद केलेल्या अटी व शर्ती बाबत सहकार्य न दिल्यास या सामंजस्य कराराचा भंग मानला जाईल आणि असहकार किंवा असहकार्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही तोटा, नुकसान किंवा हक्कांसाठी असहकार पक्ष जबाबदार असेल.

४. सामंजस्य कराराच्या समाप्ती पर्यंतच्या खर्चाच्या रकमेपेक्षा जास्त दिलेल्या आगाऊ निधीची वेणूशिल्पी संस्था कडून वसुली करण्याचे हक्क शबरी महामंडळाला असतील.

५. या सामंजस्य कराराच्या पूर्ण किंवा समाप्तीमध्ये थकबाकीची अंतिम तोडगा, सेवा पूर्ण करण्याचे प्रमाणपत्र आणि मालकी माहिती न जाहिर केल्यासह अंतिम सेटलमेंट डिस्चार्ज असाइनमेंटचा समावेश असेल.

**१६) नुकसान भरपाई आणि मर्यादित उत्तरदायित्व**

कोणताही पक्षकार दुसऱ्या पक्षकाराच्या या करारनाम्यात नमूद नियम आणि अटींच्या उल्लंघनसाठी कारणीभूत असणार नाही.

कोणत्याही परिस्थितीत वेणूशिल्पी संस्था खालील नमूद बाबींमुळे उदभवनाऱ्या परिणामास जबाबदार राहणार नाही

१) निधी न मिळाल्यामुळे किवा मिळण्यास विलंब झाल्यामुळे प्रकल्पाच्या प्रगतीच्या टप्प्यांवर किंवा टाईमलाइनवर परिणाम झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास.

२) देवतेची कृती, युद्ध, बंडखोरी, क्रांती, विद्रोह किंवा सैन्य किंवा ताब्यात घेतलेली शक्ती किंवा गृहयुद्ध, दंगली, संप, कृत्ये किंवा दहशतवादाचा धोका यासारख्या चक्रव्यूहाची सक्ती इ. झाल्यास.

३) मात्र अ.न. १ व २ बाबींमुळे उदभवनाऱ्या परिणामामुळे प्रकल्प मुदत वाढीबाबतचा निर्णय सक्षम प्रधीकरणामार्फत सांगोपांग विचार विनिमयाने शबरी महामंडळामार्फत घेण्यात येईल.

**१५. नोटीस**

या सामंजस्य करारानुसार आवश्यक असणारी किंवा अधिकृत केलेली कोणतीही सूचना किंवा एखादी माहिती दुसऱ्या पक्षाला द्यायची असेल तर ती नोंदणीकृत पोस्टद्वारे किंवा कुरिअरद्वारे किंवा संप्रेषणाच्या तुलनात्मक किंवा प्रेषण साधनाद्वारे पाठविली जाऊ शकते.

To,

डॉ. निरुपमा सुनिल देशपांडे
अध्यक्ष
वेणुशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था, मर्यादित मु. लवादा,
पो. दुनी, ता. धारणी, चिखलदरा जि. अमरावती.
पिन - ४४४७०२.
इमेल : venushilpi1998@gmail.com

To,

मा. व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्तव विकास महामंडळ मर्या.
दुसरा मजला,आदिवासी विकास भवन,
राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक– ४२२००२.

**१६.लवाद आणि न्यायालयांचे कार्यक्षेत्र**

१. प्रकल्प अंमलबजावणीच्या प्रक्रियेत कोणत्याही स्वरूपाचा वाद उदभवल्यास, दोन्ही पक्ष म्हणजे शबरी महामंडळ व वेणूशिल्पी संस्था यांच्या एकत्रित बैठकीद्वारे आणि विशिष्ट मुद्द्यांवर चर्चा करून व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांचे मान्यतेने वाद मिटवतील.

२. जर मध्यस्थीची गरज भासल्यास, या सामंजस्य कराराच्या किंवा त्यानंतरच्या दोन पक्षांमधील वाद किंवा मतभेद लवादाकडे सोपविण्यात येईल. या उद्देशाने व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ, नाशिक यांच्यामार्फत लवाद (Sole Arbitrator) ची नेमणूक केली जाईल.

३. लवादाच्या कारवाई संदर्भात उभयपक्ष स्वत: चा खर्च स्वतः अदा करतील.

४. वरील प्रक्रिया Arbitration and Conciliation Act, 1996 मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये राबविण्यात येईल.

५. कोणताही वाद उद्भवल्यास अथवा समजौता न झाल्यास न्यायालयीन प्रक्रियेकरिता शबरी महामंडळाचे नाशिक मुख्यालय असल्याने नाशिक हे कार्य क्षेत्र असेल.

**१७. दुरुस्ती/सुधारणा**

या सामंजस्य करारात उभयपक्षांकडून परस्परलेखी आणि विधिवत संमतीशिवाय या सामंजस्य करारात कोणतीही सुधारणा, परिशिष्ट, बदल किंवा स्पष्टीकरण वैध किंवा बंधनकारक असणार नाही.

दोन्ही पक्ष मान्य करतात की हा सामंजस्य करार कायदेशीर रित्या प्रत्येकावर बंधनकारक आहे आणि प्रत्येक पक्षाकडून एकमेकांप्रती चांगल्या विश्वासाने व कुठल्याही धाक दडपणास बळी न पडता मुक्त संमतीने करण्यात आलेला आहे.

येणे करून साक्षीदारांच्या समवेत अधिकृत अधिकारांच्या स्वाक्षऱ्यानिशी हा करारनामा नमूद दिनांकावर पार पाडण्यात आला.

| **पक्ष नं. २**<br>वेणूशिल्पी औद्योगिक सहकारी संस्था मर्या, मु. लवादा, पो. दुनी, ता. धारणी, जि. अमरावती. | **पक्ष नं. १**<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक. |
|---|---|
| | |
| १) **नावं :** डॉ. निरुपमा सुनिल देशपांडे<br>**पद :** अध्यक्ष | |
| | **नावं :** श्रीमती. लीना बनसोड (भा. प्र. से.)<br>**पद :** व्यवस्थापकीय संचालक |
| २) **नावं** : श्रीमती चंदा आबास कनोजे<br>**पद :** सचिव | |

**साक्षीदार**

१.

**नावं :**
**पदनाम :**

३.

**नावं :**
**पदनाम :**

२.

**नावं :**
**पदनाम :**

४.

**नावं :**
**पदनाम :**

**Enclosure:** १. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक, जा.क्र. शआविविम/ के.सहा. / प्रकल्प/ /२२ दि. .१२.२०२२ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना.